# जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक

(महसुल शाखा)

फोन नंबर-:0253-2319006 Email ID estnashik@gmail.com

**वाचले:-**

1) केंद्र शासनाकडील पर्यावरण व वनमंत्रालयाकडील सारसंग्रहीत आदेश क्र.2-36-86 एफसी-दिनांक 31/07/1986.
2) शासन महसुल व वनविभाग परिपत्रक क्र.एलएनडी-1071/18/3736-अ/दोन दिनांक 09/09/71.
3) जिल्हाधिकारी नाशिक यांचे प्रमा आदेश क्र.जिनिस/क-12/सस-4/6368, सन 14 दि.20/08/2014.
4) कार्यकारी अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) विभाग नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र./ल.सिं/ (जलसंधारण) वि/ ना/प्रशा/4764/सन 2016 दिनांक 14/09/2016.
5) उपवनसंरक्षक पुर्व भाग, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र.कक्ष 3/जमिन/141510/1956/सन 2017-18 दिनांक 17/02/2018.
6) कार्यकारी अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) विभाग नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र./प्रशा/ममदापुर /1764/ 2018 दिनांक 13/03/2018.
7) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 22

COLLECTOR OF NASHIK

---

क्र.मशा/कक्ष/3/6/कावि-270/2018

नाशिक दिनांक:- 19 /04/2018.

**आदेश**

केंद्र शासनाकडील पर्यावरण व वन मंत्रालयाकडील सासंग्रहीत आदेश क्र.2-3-86 एफसी दिनांक 31/07/1986 चे परिच्छेद 8(1) अ नुसार वन जमीनीचा उपयोग वनेतर कामासाठी करावयाचा असल्यास तितकीच वनेतर जमीन उपलब्ध करून देण्याची तरतुद असुन उपलब्ध वनेतर जमीनीवर पर्यायी वनीकरणाची योजना राबवावयाची आहे अशा वन जमीनीच्या बदल्यात वनेतर जमीन उपलब्ध केल्यावरच वन जमीन वापरण्यास परवानगी देण्याची तरतुद आहे.

नाशिक जिल्हयातील खालील कामासाठी वन जमीन घेण्यात येणार आहे व त्यासाठी वनेतर जमीन उपलंब्ध करून देण्याचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग नाशिक यांचेकडुन पत्र दिनांक 14/09/2016 व दिनांक 13/03/2018अन्वये इकडेस प्राप्त झालेला आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नांव | प्रकल्पासाठी संपादीत होणारी वनजमीन | | |
|---|---|---|---|---|
| | | गांवाचे नांव व तालुका | फॉरेस्ट कंपार्टमेट नंबर/कुप क्र./ भाग क्र. | क्षेत्र हे.आर |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | साठवण तलाव ममदापुर ता.येवला जि.नाशिक | मौजे ममदापुर ता.येवला | कंपार्टमेट नं.531 कुप क्र.7 भाग क्र. 10 | 28.60 |
| | | | **एकूण** | **28.60** |

उपरोक्त प्रमाणे साठवण तलाव ममदापुर ता.येवला या प्रकल्पासाठी लागणाऱ्या 28.60 हे.आर वन जमिनीचे बदल्यात वन विभागास पर्यायी वनेतर जमीन उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने, नाशिक जिल्हयातील महाराष्ट्र शासन म्हणुन 7/12 सदरी नोंद असलेली जमीन ही वनजमीन म्हणुन सोईस्कर व सदर जमीनीस वनजमिनीचा दर्जा प्राप्त होऊ शकेल किंवा कसे? याबाबत उपवनसंरक्षक पुर्व भाग यांचे अभिप्राय मागविण्यात आलेले होते. त्यानुसार उपवनसंरक्षक पुर्व भाग नाशिक यांनी त्यांचे वाचले क्र. 5 वर नमुद पत्रान्वये खालील तक्त्यातील मौजे वडाळी बु: ता.नांदगांव येथील गट नं. 63 ते 67 मधील क्षेत्र 28.60 हे.आर ही जमीन पर्यायी वनेतर जमीन म्हणुन प्रस्तावित करण्यात येत आहे.असे अभिप्राय इकडेस सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नांव | प्रकल्पासाठी पर्यायी वळतीकरण होणारी वनेतर जमीन | | |
|---|---|---|---|---|
| | | गांवाचे नांव व तालुका | गट नंबर | क्षेत्र हे.आर |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | साठवण तलाव ममदापुर ता.येवला जि.नाशिक | वडाळी बु: ता. नांदगांव | 63 पै | 5.00 |
| 2 | | | 64 पै | 7.00 |
| 3 | | | 65 पै | 7.00 |
| 4 | | | 66 पै | 7.00 |
| 5 | | | 67 पै | 2.60 |
| | | | **एकूण** | **28.60** |

जिल्हाधिकारी कार्यालय नियोजन भवन, विभाग नाशिक यांचेकडील आदेश क्र.जिनिस/क-12 /सस-4/6368 सन 2014 दिनांक 20/08/2014 नुसार प्रस्तुत साठवण तलावाचे कामकाजास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सबब शासन महसूल व वनविभागाकडील परिपत्रक दिनांक 9 सप्टेंबर 1971 अन्वये प्राप्त अधिकार तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 22 चे तरतुदीनुसार मी जिल्हाधिकारी नाशिक या आदेशान्वये मौजे वडाळी बु: ता.नांदगाव जि.नाशिक येथील वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे गट नं. 63 ते 67 चे एकुण क्षेत्र 35.34 हे.आर पैकी 28.60 हे.आर इतके क्षेत्र मौजे ममदापुर ता.येवला येथील साठवण तलावाकरीता लागणाऱ्या वनजमीनीचे बदल्यात पर्यायी वनेतर जमीन म्हणुन वन विभागाकडे वर्ग करण्यास मंजुरी देत आहे. आवश्यक त्या नोंदी अभिलेखात घेण्यात याव्यात.

COLLECTOR OF NASHIK

16/4/18

**(राधाकृष्णन बी.)**
**जिल्हाधिकारी नाशिक**

प्रत:- 1) कार्यकारी अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) विभाग नाशिक.
2/-पर्यायी म्हणुन दिलेल्या जमीनीची मोजणी करणेबाबत आपले स्तरावरून कार्यवाही करावी.
2) उप वनसंरक्षक, पुर्व भाग, नाशिक यांचेकडेस माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.
3) तहसिलदार नांदगांव यांचेकडेस
2/-वरीलप्रमाणे वर्ग केलेल्या जमीनीचा ताबा वन विभागास दयावा. तसेच दुरूस्त 7/12 उतारा व 6 ड नोंदीसह अहवाल इकडेस सादर करावा.
4) जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख नाशिक यांना उचित कार्यवाहीसाठी रवाना.
5) उपविभागीय अधिकारी येवला भाग येवला यांचेकडेस माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

**जिल्हाधिकारी नाशिक करिता**